1 6 SEP 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशासाठी सेवेप्रती भक्ती असणे आवश्यक

## रघुनाथ मेडगे : यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटतर्फे कार्यक्रम






**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटतर्फे आयोजित इंडक्शन प्रोग्रॅममध्ये बोलताना मुंबई डबेवाला संघटनेचे माजी अध्यक्ष रघुनाथ मेडगे.**

**▶ सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : मनामध्ये सेवेप्रती भक्ती असणे, हे यशासाठीचे आवश्यक कौशल्य आहे, असे प्रतिपादन मुंबई डबेवाला संघटनेचे माजी अध्यक्ष रघुनाथ मेडगे यांनी आज येथे केले. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी प्रामाणिक कष्ट गरजेचे आहेत, असेही ते म्हणाले.

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटतर्फे आयोजित इंडक्शन प्रोग्रॅममध्ये ते बोलत होते. मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख अध्यक्षस्थानी होते.

मेडगे म्हणाले, 'आयुष्यात यशस्वी होण्यासाठी ध्येयनिश्चिती करावी लागते. निर्धारित ध्येय प्राप्तीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक असतात. क्षेत्र कोणतेही असो, यशस्वी होण्यासाठी कष्ट करावे लागतात. मुंबई डबेवाला संघटनेमध्ये सुमारे पाच हजार सदस्य, ८०० मुकादम आणि ९ संचालक आहेत. त्यांचे सरासरी माध्यमिक शिक्षण झालेले आहे. संघटना कोणतेही आधुनिक तंत्रज्ञान वापरत नाही. तसेच दैनंदिन कार्यात प्रदूषणविरहित साधनांचा वापर केला जातो. मनुष्यबळाचे योग्य नियोजन, कामातील समन्वय आणि सदस्यांचा प्रामाणिक सहभाग यांच्या आधारे दररोज सुमारे चार लाख जेवणाच्या डब्यांची निर्धारित वेळेत देवाण-घेवाण केली जाते. त्यामुळे संघटनेवर विश्वास ठेवणारे ग्राहक पूर्णपणे संतुष्ट व समाधानी आहेत. म्हणूनच मुंबई डबेवाला संघटनेच्या कार्यपद्धतीवर जगभरातील विविध नामवंत संस्थांनी संशोधन केले आहे.'

डॉ. देशमुख यांनी कौशल्य आणि रोजगाराच्या संधी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. नितीन माळी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. तेजश्री मोहरेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. उमेश गडेकर यांनी आभार मानले.

पुढारी

# ‘दूरशिक्षण’ एमबीए अभ्यासक्रम प्रवेशासाठी अर्जाची आज शेवटची मुदत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील ‘दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रा’तर्फे सुरू असणाऱ्या एम.बी.ए. अभ्यासक्रमाकरिता चालू शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ करिता प्रवेशासाठी अर्ज करण्याची शेवटची मुदत १६ सप्टेंबर आहे. दूरशिक्षण विभागातर्फे ‘एआयसीटीई’ नवी दिल्ली, यूजीसी डीईबी मान्यताप्राप्त हा अभ्यासक्रम आहे. अनुभवी विषयतज्ज्ञ व त्यांनी लिहिलेले स्टडी मटेरियल, शंका निरसनासाठी ऑनलाईन संपर्क सत्रे असणार आहेत. विद्यार्थ्यांच्या सोयीकरिता तीन जिल्ह्यांत सहा परीक्षा केंद्रे असतील. एकाच वेळी दोन अभ्यासक्रमांना प्रवेशाची संधी मिळणार आहे. कोणतेही दोन ऐच्छिक विषय निवडण्याची मुभा असणार आहे.

पुण्यनगरी

# हिंदी भाषेला वैश्विक महत्त्व : डॉ. मंगलेश

कोल्हापूर : जगभरात ३०० कोटींपेक्षा जास्त लोक रोज हिंदीतून व्यवहार करतात. त्यामुळे हिंदी भाषेला वैश्विक भाषेचे महत्त्व प्राप्त होते, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील हिंदी अनुवाद साहित्य परिषदेचे समन्वयक डॉ. अशोककुमार मंगलेश यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र अंतर्गत हिंदी विभाग आणि प्लेसमेंट सेल यांच्यातर्फे हिंदी दिनाचे औचित्य साधून 'हिंदीचे महत्त्व आणि रोजगाराच्या संधी' या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी संचालक डॉ. डी. के. मोरे होते. प्रमुख पाहुण्यांची ओळख सहा. प्राध्यापक डॉ. एस. वाय. चोपडे यांनी करून दिली. सूत्रसंचालन डॉ. चांगदेव बंडगर यांनी केले. आभार सहा. प्राध्यापक डॉ. नितीन रणदिवे यांनी मानले.

तरुण भारत

# 'सायबर गुन्हे जागरुकता'वर आज विद्यापीठात व्याख्यान, चर्चासत्र

कोल्हापूर : विद्यापीठाचा विधी विभाग, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीजच्यावतीने शनिवारी, १६ रोजी सायबर गुन्ह्यांबाबतची जागरुकता : समस्या व खबरदारीचे उपाय यावर व्याख्यानाचे आयोजन केले आहे. पुणे येथील सायबर तज्ज्ञ संदीप गादिया मार्गदर्शन करणार आहेत. वि. स. खांडेकर भाषाभवन येथे कार्यक्रम होणार आहे. उद्घाटन पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांच्या हस्ते होणार आहे. प्र. कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील अध्यक्षस्थानी आहेत. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपाधीक्षक सरदार नाळे, उपाधीक्षक सुवर्णा पत्की यांची उपस्थिती आहे. याचा लाभ घेण्याचे आवाहन चेंबरचे अध्यक्ष संजय शेटे यांनी केले आहे.

सकाळ





कोतोली : गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रमाणपत्र वितरणप्रसंगी डॉ. व्ही. पी. पाटील, प्रा. एस. एम. चौगुले आदी.

# कोतोलीतील सहा विद्यार्थिनींना विद्यापीठाची गुणवत्ता शिष्यवृत्ती

पुनाळ : कोतोली (ता. पन्हाळा) येथील सहा विद्यार्थिनींना शिवाजी विद्यापीठाची शिष्यवृत्ती मिळाली. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात देण्यात येणारी गुणवत्ता शिष्यवृत्ती महाविद्यालयातील विद्यार्थिनी श्रुती सुनील जाधव, समीक्षा संतोष जाधव, आरती संजय पाटील, शुभांगी दिलीप पाटील, शामल संजय लव्हटे, संपदा दत्तात्रय संकपाळ यांना मिळाली. प्रत्येकी पाच हजार व प्रशस्तीपत्र देण्यात आले. विद्यार्थ्यांना ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. के. एस. चौगुले, सचिव शिवाजीराव पाटील, प्र. प्राचार्य डॉ. व्ही. पी. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. बी. एन. रावण, सायन्स विभागप्रमुख प्रा. एस. एम. चौगुले, शिष्यवृत्ती समितीप्रमुख डॉ. बी. एस. शिंदे, प्रा. पी. डी. माने यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

# प्रा. ज्योती खराडे यांना पीएच.डी.



ज्योती खराडे

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या गणित शास्त्र विभागातील सहायक प्रा. ज्योती खराडे यांना पीएच.डी. प्रदान केली. 'अनालिसिस ऑफ फ्रॅक्शनल डिफरेंशियल इक्वेशन्स इनव्हॉल्व्हिंग जनरलाइज्ड हिल्फर फ्रॅक्शनल डेरिव्हेटिव्ह' या विषयावर त्यांनी शोधप्रबंध सादर केला. त्यांनी डॉ. किशोर कुच्चे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. पूर्ण केली. विभाग प्रमुख डॉ. सरिता ठकार, डॉ. मच्छिंद्र गोफणे यांचे सहकार्य लाभले.